यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा परोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479

परीक्षा विभाग / Examination Division

जा.क्र. पनिका-50/ 2024/1562

दि. 25 सप्टेंबर 2024

परिपत्रक

विद्यार्थ्याच्या पदवी प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याचा फोटो, सही व त्याचे मराठी (देवनागरी) नाव छापले जाते. सदर माहिती ही विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश घेतेवळी प्रोफाईलमध्ये भरलेली असते. त्यानुसार सदर माहिती ही विद्यार्थ्याचे गुणपत्रक व पदवी प्रमाणपत्र छपाई करतेवळी उपयोगात आणली जाते. परंतु, असे निदर्शनास आले आहे की, काही विद्यार्थ्याचे मराठी नाव हे इंग्रजी नावाप्रमाणे मराठीत (देवनागरी) नसते. तसेच Student Profile मध्ये विद्यार्थ्याने जुना / Blur असलेला फोटो अपलोड केलेला असतो. त्यामुळे सदर विद्यार्थी पदवीचा कालावधी पूर्ण केल्यानंतर गुणपत्रक / पदवी प्रमाणपत्र दुरुस्ती करण्याची मागणी करतात.

या अनुषंगाने सदर परिपत्रकाद्वारे विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी आपले गुणपत्रक / पदवी प्रमाणपत्रावर प्रींट झालेले नावाचे नाव, स्पेलिंग व फोटो तसेच परीक्षा प्रवेश पत्रावर (Hall Ticket) प्रींट झालेले मराठीतील नाव तपासून त्यात काही दुरुस्ती असल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

A. विद्यार्थ्याने आपल्या Student Profile मध्ये लॉगीन करून माहिती पडताळून पहावी व इंग्रजी / मराठी नावामध्ये दुरुस्ती / बदल करावयाचा असल्यास तसेच फोटो बदलासंदर्भात नोंदणी कक्षाशी संपर्क साधून कार्यवाही करावी. *(यासंदर्भात विद्यार्थी सेवा विभागाचे दि. 28.8.2024 चे परिपत्रकातील मुद्दा क्र. 3 व 4 अन्वये विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे सूचित केले आहे.)*

1. विद्यार्थ्यांना प्रोफाईलमध्ये काही बदल/ दुरुस्ती करावयाची असल्यास, विद्यार्थ्यांनी नोंदणी कक्षाकडे विहित नमुन्यातील पूर्णपणे भरलेला अर्ज व साक्षांकित केलेले संबंधित पुरावे सादर करणे अनिवार्य आहे. (सोबत सहपत्र क्र. 1 नुसार नमुना अर्ज जोडलेला आहे.) विद्यार्थ्यांनी पूर्णपणे भरलेला विहित नमुन्यातील अर्ज व संबंधित पुरावे reg.correction@ycmou.ac.in या मेलवर पाठवावे. सदरचे अर्ज व पुरावे प्राप्त झाल्यानंतर अर्जाची विहित कार्यपध्दती व नियमानुसार कार्यवाही करून देण्यात येईल. नव्याने प्रवेशित झालेल्या शैक्षणिक वर्ष 2024-25 च्या विद्यार्थ्यांना परीक्षा विभागाकडून जोपर्यंत परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) दिले जात नाही, तोपर्यंत शुल्क न आकारता त्यांच्या प्रोफाईलमधील बदल / दुरुस्ती करण्यात येईल.
2. परीक्षा विभागाने परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) दिल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना प्रक्रिया शुल्क रू. 300/- आकारून विहित पध्दतीने प्रोफाईल बदल/ दुरुस्ती करावी लागेल.

B. तसेच विद्यार्थ्याने Student Profile मध्ये त्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. अद्ययावत करणे अनिवार्य आहे. जेणेकरून, विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून वेळोवेळी एसएमएस (SMS) / ईमेल (E-mail) पाठविता येईल.

नोंदणी कक्षाशी संपर्कासाठी दूरध्वनी / मोबाईल क्र. व ई-मेल आय.डी. खालीलप्रमाणे

दूरध्वनी व मोबाईल क्रमांक	(0253) 2230580, 2230106, 2231714, 2231715, 9307579874, 9307567182, 9272046725,
ई-मेल आय.डी.	reg.correction@ycmou.ac.in

तरी पदवी प्रमाणपत्रातील दुरुस्ती / बदलासाठी विद्यार्थ्यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही दि. 25 ऑक्टोबर 2024 पर्यंत करणे अपेक्षित आहे. तथापि, कार्यवाही न केल्यास पदवी प्रमाणपत्रातील दुरुस्ती / बदलासाठी विहित शुल्क आकारण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक

(भटूप्रसाद पाटील)
परीक्षा नियंत्रक

सोबत – विहित नमुना अर्ज

प्रति
सर्व विभागीय संचालक / वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार,

माहे डिसेंबर 2023 / जानेवारी 2024, मे-जून 2024 मध्ये उत्तीर्ण झालेल्या पदवी / पदविका / पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या, आपल्या अधिनस्त असलेल्या अभ्यासकेंद्राना विद्यार्थ्यांशी संपर्क साधून वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यास अवगत करावे.

प्रत – 1. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग – नोंदणी कक्षाने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जांबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही दिक्षांत संमारभापुर्वी करावी. ही विनंती

2. उपकुलसचिव, परीक्षा कक्ष 1, 2 व 3
3. प्रमुख, संगणक कक्ष (परीक्षा)

प्रत माहितीस्तव – मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

सहपत्र क्र.1- सन 2024-25 या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये दूरूस्ती/बदल -

विद्यार्थ्याचे नाव व संपूर्ण पत्ता.....

मोबाईल क्रमांक/ई-मेल.....

शिक्षणक्रमाचे नाव व संकेतांक.....

कायम नोंदणी क्रमांक.....

दिनांक .....

प्रति,

मा.संचालक, विद्यार्थी सेवा विभाग,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२२२२

विषय - सन 2024-25 या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये दूरूस्ती/बदलाबाबत...

महोदय,

१) उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करतो/ करते की, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सन 2024-25 या शैक्षणिक वर्षाकरिता ऑनलाईन पद्धतीने ..... या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतलेला होता. प्रवेशाच्या वेळी खालील त्रुटी झाल्याचे निदर्शनास आले आहे खालील✓ अशी खूण केलेला मुद्दा दूरूस्ती/बदल करून मिळावा.

क्र.	तपशील	ऑनलाईन प्रोफाईलमध्ये असलेले चूकीची माहिती		ऑनलाईन प्रोफाईलमध्ये दूरस्ती/ बदल करावयाची माहिती	
		मराठी नाव	इंग्रजी नाव	मराठी नाव	इंग्रजी नाव
1	स्वतःचे नाव				
	वडिलांचे नाव				
	आईचे नाव				
	आडनाव				
	संपूर्ण नाव				
2	जन्मतारीख				
3	जात				
4	फोटो				
5	स्वाक्षरी				
6	पत्ता				

२) वर नमूद केलेल्या मुद्यांबाबत दूरूस्ती/ बदल करत असतांना माझ्याकडून काही त्रुटी राहून कायदेशीर बाब उदभवल्यास मी त्यास सर्वस्वी जबाबदार राहीन हया अटीवर सदरची दूरूस्ती/बदल करून मिळावा, ही विनंती.

(विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी)

सोबत -

1) नाव दूरूस्तीसाठी साक्षांकित पुरावा - शाळा सोडल्याचा दाखला / 10 वी गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र / 12 वी गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र (मराठी / इंग्रजी नावानुसार पुरावा जोडणे अनिवार्य)
2) नाव बदलासाठी साक्षांकित पुरावा - राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र (मराठी / इंग्रजी नावानुसार पुरावा जोडणे अनिवार्य)
3) फोटो/ स्वाक्षरी बदलासाठी - साक्षांकित केलेले फोटो असलेले ओळखपत्र आणि फोटो व स्वाक्षरी नमुना अनिवार्य असेल.
4) जन्मतारीख दुरूस्तीसाठी पुरावा - शाळा सोडल्याच्या मुळ प्रतींवरून पडताळणी करणे अनिवार्य असेल आणि या दाखल्याची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करावी.
5) जात दूरूस्तीसाठी पुरावा - जातीचे मुळ प्रमाणपत्रावरून पडताळणी करणे अनिवार्य आहे. या प्रमाणपत्राची साक्षाकिंत प्रत अर्जासोबत सादर करावी.